महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१
ई-मेल : desk२०.dgoffice@mahapolice.gov.in

क्रमांक : पोमसं/२०/१९५/एक मंडळ-एक पोलीस योजना/०२/२०२५ मुंबई, दिनांक : १२/०९/२०२५

## पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्र. ०४/२०२५

**विषय : " एक मंडळ - एक पोलीस अंमलदार " योजना राबविण्याबाबत.**

******

महाराष्ट्र राज्यात वर्षभरात गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दहीहंडी, मोहरम, ईद-ए-मिलाद-उन-नबी, शिवजयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती आदी अनेक धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक सण-उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. या सर्व उत्सवांदरम्यान नागरिकांची सुरक्षितता, कायदा-सुव्यवस्था राखणे, वाहतूक नियंत्रण करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देणे हे पोलीस प्रशासनाचे महत्वाचे कर्तव्य असते.

सण-उत्सवांचे आयोजन करणाऱ्या स्थानिक मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी पोलीस प्रशासनाचा सातत्यपूर्ण संपर्क व समन्वय असल्यास संभाव्य अडचणी आधीच ओळखता येतात आणि त्या वेळेत सोडवता येतात. या उद्देशाने " एक मंडळ - एक पोलीस अंमलदार " ही योजना राबविण्यात येत आहे.

➢ **योजनेचे उद्दिष्ट :**

- स्थानिक मंडळ व पोलीस प्रशासन यांच्यात सातत्यपूर्ण व थेट संपर्क राखणे.
- सण-उत्सवांदरम्यान होणाऱ्या अडचणी त्वरित दूर करणे.
- कायदा-सुव्यवस्था अबाधित राखणे व नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी देणे.
- अनावश्यक गैरसमज, वाद किंवा अनुशासनभंग टाळणे.
- उत्सव यशस्वी, शांततेत व सुरक्षिततेत पार पडण्यासाठी समन्वय बळकट करणे.

➢ **अंमलबजावणी पद्धत :**

- प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व मंडळांची यादी तयार करण्यात यावी.
- उपलब्ध पोलीस अंमलदार/अधिकाऱ्यांची संख्या लक्षात घेऊन प्रत्येक अंमलदाराला एक किंवा दोन मंडळांची जबाबदारी दिली जाईल.
- अंमलदार उपलब्ध नसल्यास एका अंमलदाराकडे कमाल ३ ते ४ मंडळांची जबाबदारी दिली जाऊ शकते.
- याबाबतचा आदेश संबंधित पोलीस स्टेशनमार्फत काढण्यात येईल व त्यावर वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची सही आवश्यक असेल.

➢ **मंडळाशी समन्वय :**

- मंडळाच्या पूर्वतयारी बैठकीत नियुक्त अंमलदाराची औपचारिक ओळख करून द्यावी.
- त्या अंमलदाराचे कार्य, जबाबदाऱ्या व अधिकार स्पष्ट करण्यात यावेत.
- मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांनी व नियुक्त पोलीस अंमलदारांनी एकमेकांचा मोबाईल क्रमांक व इतर संपर्क माहिती जवळ ठेवावी. सर्व संबंधितांचे WhatsApp Group तयार करण्यात यावे.

➢ **पोलीस अंमलदाराची जबाबदारी :**

- उत्सव सुरू होण्यापूर्वीच मंडळाशी संपर्क साधून संपूर्ण कार्यक्रमाची माहिती घेणे. मंडळांना नियमानुसार सर्व अर्ज करुन रितसर परवानग्या मिळवून देणे.
- आगमन मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक विधी, विसर्जन मिरवणूक यांची वेळ, मार्ग, सहभागी संख्या याची माहिती घेणे व वरिष्ठांना कळविणे. कुठल्याही परिस्थितीत मिरवणुकीचा पारंपारीक मार्ग बदलणार नाही याची खात्री करावी.
- मंडळांना ध्वनी प्रदुषणबाबत जागृत करावे.
- आक्षेपाहर्य देखावे / गाणी इ. होणार नाहीत हे पहावे.
- वाहतूक पोलीस, बीट अधिकारी व स्थानिक प्रशासन यांच्याशी समन्वय साधणे.
- मंडळाला येणाऱ्या परवानगीविषयक किंवा इतर अडचणी तात्काळ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे.
- मंडळाच्या सतत संपर्कात राहून तातडीच्या प्रसंगी त्वरित प्रतिसाद देणे.
- नियुक्त अंमलदार, मंडळ व पोलीस स्टेशन यांच्यातील संपर्कासाठी WhatsApp ग्रुप तयार करावा.
- नेमून दिलेल्या मंडळांना दररोज किमान एकदा भेट दयावी व सर्व पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करावी.
- मिरवणूकीत सामिल होतांना, मिरवणूक सुरु असतांना, तसेच मिरवणूक संपल्यानंतर, मंडळ परत आपल्या भागात पोहचेपर्यंत अंमलदार सोबत राहतील.
- प्रत्येक उत्सव संपल्यानंतर नियुक्त अंमलदाराने लघु अहवाल पोलीस ठाणेस सादर करावा. अहवालात अंमलबजावणीतील यश, आलेल्या अडचणी व भविष्यातील सुधारणा यांचा समावेश असावा.

➢ **वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पर्यवेक्षण :**

- पोलीस निरीक्षक/वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी नियुक्त अंमलदारांची वेळोवेळी बैठका घेऊन प्रगतीचा आढावा घ्यावा.
- उत्कृष्ट काम करणाऱ्या पोलीस अंमलदारास प्रशस्तीपत्र देवून गौरव करावा.

➢ **योजनेचा अपेक्षित परिणाम :**

- सण-उत्सव शिस्तबद्ध पद्धतीने व सुरक्षिततेत पार पडतील.
- नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास वाढेल.
- संभाव्य वाद, वाहतूक अडचणी व कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न पूर्वीच सोडवता येतील.

त्याअनुषंगाने, सर्व घटक प्रमुखांना आदेशित करण्यात येते की, उपरोक्तबाबत त्यांचे अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे यांना अवगत करुन सदर योजना धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक सण-उत्सव दरम्यान अंमलबजावणी करण्याबाबत सुचित करावे.

**( रश्मि शुक्ला )**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य

**प्रति,**

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह)

**प्रत :**

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक